

# चर्चासत्र

## 2000

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक परिषद

दिनांक ११ व १२ नोव्हेंबर २०००

स्थान : सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, तुळशीबाग, महाल, नागपूर.

Scanned by CamScanner



**डॉ. सी. डी. पाध्ये**

## विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षकपरिषद निर्मितीच्या निमित्ताने

सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या निमित्ताने कनिष्ठ महाविद्यालयाला शिकविणाऱ्या अर्थशास्त्र व वाणिज्य विषयाच्या शिक्षकांची आपापसात विचारांची देवाणघेवाण झाली. गेल्या दोन्ही वर्षाच्या प्रशिक्षणार्थीकडून सामान्यतः एकाच प्रकारचे विचार प्रगट झाले. अर्थशास्त्र व वाणिज्य विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचे अभ्यासपूरक संघटन असावे व त्यातून विषय शाखा विकासाचा विचार व्हावा हा एकमेव उद्देश त्यात होता.

या वर्षी सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या निमित्ताने पूणे येथे महाराष्ट्र स्तरावर विषय तज्ञांची सभा घेण्यांत आली. त्या अन्वये डॉ. चंद्रशेखर पाध्ये, डॉ. हसनअली हुद्दा, प्रा. राजाभाऊ दुरुगकर, इत्यादी तज्ञ मंडळींनी संचालक, उपसंचालक, नागपूर बोर्डाचे अध्यक्ष इत्यादींची भेट घेऊन विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ वाणिज्य शिक्षक परिषदेची रुपरेषा व कार्य पद्धती स्पष्ट केली. नागपूर विभागाचे उपसंचालक श्री. मस्के साहेबांच्या मार्गदर्शनामुळे व सहकाऱ्यांच्या अथक प्रयत्नापुढे ही परिषद अस्तित्वात आली. या निमित्ताने शिक्षक आपली निश्चितच गुणवत्ता वाढवतील म्हणून प्राचार्यांनी शिक्षकांचे मूल्यमापण करण्याच्या दृष्टीने सेवापुस्तिकेत या प्रमाणपत्रांची नोंद घ्यावी अशा आशयाचे पत्रक मा. उपसंचालक कार्यालयाव्दारे काढण्यात आले आहे. अशाच प्रकारची कार्यवाही अमरावती विभागात देखील झालेली आहे. प्रा. राजाभाऊ दुरुगकर यांच्या संघटन कौशल्यामुळे व पुढाकाराने हे सर्व घडत आहे. डॉ. हसनअसी हुद्दा परिषदेच्या नोदणीविषयक कार्यवाहीसाठी कार्यरत आहेत. तर डॉ. सौ. अरुणा सोनेगावकर, सौ. आशा लांजेवार, प्रा. परांजपे, प्रा. डी. एच. बिसेन इत्यादींची त्यांना साथ आहे.

**या सहस्त्रकाच्या उंबरठ्यावर सी. पी. अॅण्ड बेरार महाविद्यालय तुळशीबाग नागपूर येथे आयोजित "चर्चासत्र २०००" ने शनिवार दि. ११ नोव्हेंबर रोजी परिषदेचे उद्घाटन होत आहे.**

**परिषदेची उद्दिष्ट्ये :-**

१) विदर्भातील कनिष्ठ महाविद्यालयांतर्गत अर्थशास्त्र व वाणिज्य विषय शिक्षकांना संघटित करणे.

२) अर्थशास्त्र व वाणिज्य विषय शिक्षकांच्या ज्ञानात भर घालणे.

३) अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील नवीन प्रवाह शिक्षकांव्दारे विद्यार्थ्यापर्यंत पोहचविणे.

Scanned by CamScanner

४) शिक्षकांचे ज्ञान विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे.

५) अधिक कार्यक्षमतेसाठी विविध अध्यापकीय साधनांचा उपयोग करणे.

६) अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील विविध शाखांची माहिती करुन घेण्यासाठी खुल्या चर्चासत्राचे आयोजन करणे. तसेच विविध विषयावरील लघुशोध निबंधाचे वाचन करणे.

७) ग्रामीण भागातील शिक्षकांचा मागास दृष्टीकोन बदलविणे.

८) कालबाह्य विचारधारा दूर करुन आधुनिक विचारांची जाणीव करुन देणे.

९) त्यांच्यातील कल्पनेला वाव देऊन सामान्य व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.

देश विकासात आपली भूमिका बजावण्याच्या दृष्टीने सर्व परिषदेचे आजीव सदस्य होऊन सहभागी व्हावे. ही विनंती.

**विदर्भ कनिष्ठ महाविद्यालाचे अर्थ वाणिज्य शिक्षक परिषदेचे प्रवर्तक**

डॉ. चंद्रशेखर पाध्ये

प्रा. राजाभाऊ दुरुगकर

प्रा. हसनअली हुद्दा

प्रा. सौ. अरूणा सोनेगांवकर

प्रा. सौ. आशा लांजेवार

प्रा. मधुकर बोरकर

प्रा. नारायण मेंडुले

Scanned by CamScanner



**संपादकीय मंडळ** : प्रा. सौ. रंजना कोगजे, प्रा. पुरुषोत्तम गान, प्रा. संजय भेंडे, प्रा. रमेश हिमते (मुख्य संपादक), प्रा. बाबुराव जिभकाटे, प्रा. सत्यवान मेश्राम, प्रा. चंद्रशेखर देशपांडे



**चर्चासत्राची कार्यकारी समिती**

**खुर्चीवर बसलेले** : प्रा. अरविंद मोहिते, प्रा. प्रमोद पेंडके, डॉ. हसनअली हुद्या (सचिव), प्रा. राजाभाऊ बुरुगकर (उपाध्यक्ष), डॉ. चंद्रशेखर पाध्ये (अध्यक्ष), प्रा. विजय गुल्हाने

**उभे असलेले** : प्रा. कु. सुमित्रा मरसकुले, डॉ. सौ. अरुणा सोनेगावकर, प्रा. चंद्रशेखर देशपांडे, प्रा. रमेश हिमते

Scanned by CamScanner

# उद्घाटन समारोहाचे मान्यवर

उद्घाटक



मा. महंमद ताहिर

अध्यक्ष



मा. ॲड. अशोकराव बन्सोड

स्मरणिकेचे विमोचक



मा. ज. वा. पांढरीपांडे

# समारोपाचे मान्यवर

अध्यक्ष



मा. एस. एस. मस्के

अतिथी



मा. सुधिर पाठक

अतिथी



मा. डी. वाय. श्रीगीरीवार

प्राचार्य



डॉ. एस. एन. बोधनकर

# परिषदेचे पदाधिकारी

अध्यक्ष



डॉ. चंद्रशेखर पाध्ये

सचिव



डॉ. हसनअली हुद्दा

उपाध्यक्ष व संयोजक



प्रा. राजाभाऊ दुरुगकर

स्मरणिका संपादक



प्रा. रमेश हिमते

Scanned by CamScanner



**डॉ. सौ. अरुणा सोनेगांवकर**
व्ही. एम. व्ही. महाविद्यालय,
नागपूर.

# बदलत्या आर्थिक धोरणांचा कृषी व्यवसायावरील परिणाम

**प्रास्ताविक :-**

भारताची स्वातंत्र्यानंतरच्या अर्धशतकातील वाटचाल अभ्यासली असता असे दिसून येते की, विकासाला पोषक अशी धोरणे आखून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास निश्चितपणे घडवून आणता येतो. मात्र या धोरणांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे झाली पाहिजे. काळानुसार अनुभवांच्या आधारावर या धोरणांत बदल हा करावाच लागतो. धोरणातील लवचिकता ही वेळ प्रसंगी विकासाकरिता मोलाची मदत करते. आर्थिक विकासाकरिता आर्थिक नियोजन अपरिहार्य आहे ते यामुळेच. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे स्वाभाविकच देशाच्या आर्थिक धोरणात कृषी विकास हा विषय नेहमीच अग्रक्रमावर राहिला आहे. स्वयंपूर्ण खेडी, उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण, घरगुती उद्योगांची वाढ हे आर्थिक धोरणातील महत्वपूर्ण मुद्दे प्रत्येक पंचवार्षिक योजनेत विचारात घेण्यात आले आहे. मात्र वारंवार प्रयत्न करुनही अपेक्षित कृषी विकास साध्य झालेला नाही ही भारताची शोकांतिका आहे. परिणाम स्वरुप देशाच्या आर्थिक धोरणात वेळोवेळी विकासाच्या दृष्टीने अनुकूल असा बदल करण्यात आलेला दिसून येतो.

**नवीन कृषी विषयक धोरण :-**

१९९७-९८ मध्ये शासनाने आपले कृषी धोरण जाहीर केले असून त्यानुसार शेतकऱ्यांचे उत्पन्न व कृषी उत्पादन वाढावे यासाठी उपलब्ध साधनसंपत्तीचा काटकसरीने, कार्यक्षमतेने, प्रभावीपणे आणि पर्यावरणाचा समतोल राखून वापर करणे व याव्दारे कृषीक्षेत्राचा शास्वत स्वरूपी विकास करणे हे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासोबतच आर्थिक धोरणात कृषी क्षेत्राला अग्रक्रम मिळावा यासाठी शेतकरी हा केंद्रस्थानी मानून शेतीचा विकास वाणिज्यिक व औद्योगिक धर्तीवर करण्यास प्रोत्साहन देणे आणि जागतिक पातळीवर ज्या संधी निर्माण होत आहेत त्यांचा पूर्ण फायदा घेण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती बळकट करणे हेही ह्या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

उपरोक्त धोरणाला अनुसरुन महाराष्ट्र राज्य शासनाने नोव्हेंबर १९९८ रोजी मुंबई येथे **"ॲग्रो ॲडव्हाण्टेज महाराष्ट्र"** या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा उद्देश राज्यामध्ये कृषी व संलग्न क्षेत्रात वेगाने निर्माण होणाऱ्या क्षमतेबाबत **शेतकरी गुंतवणूकदार व उद्योजक** यामध्ये जागृती निर्माण करणे आणि **कृषी प्रक्रिया** उद्योगात देशांतर्गत व विदेशी अशा दोन्ही प्रकारच्या गुंतवणुकदाराकडून होणाऱ्या गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे हा होता. या निमित्ताने शासनाने **कृषी-औद्योगिक** प्रोत्साहन योजना मंजूर केली असून या योजनेची प्रमुख अंगे पुढील प्रमाणे आहेत.

Scanned by CamScanner

१) कृषी उद्योगामध्ये **शेती, फलोत्पादन, पुष्पोत्पादन,** इत्यादींवर आधारित उद्योगांचा आणि **पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुट व इतर पक्षीपालन, मत्स्यव्यवसाय** अशा **कृषीसंलग्न** उपक्रमांवर आधारित उद्योगांचा देखिल समावेश करण्यात आला आहे.

२) उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि उद्योग राज्यभर विखुरले जाण्यासाठी त्यांना ज्या सुविधा व सवलती देण्यात येत आहेत त्या ह्या नवीन योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या **कृषी उद्योगांना** देखिल लागू करण्यात आलेल्या आहेत.

३) **फळे, फुले व भाजीपाला** यांची साठवणूक करण्यास आणि देशांतर्गत व देशाबाहेर वाहतुक करण्यास चालना देण्यासाठी प्रि. कुलींग केंद्रे, शितगृहे व शितवाहन वाहतुक यांचा समावेश असलेली शीत साखळी स्थापन करण्यात सहाय्य देण्याकरिता एक योजना सुरु करण्यात आली आहे.

४) शेतकऱ्यांना **निर्यातक्षम कृषी उत्पादनाच्या** बाजारभावांबाबतची व्यावसायिक माहिती हवी तेव्हा हवी त्याप्रमाणेउपलब्ध करुन देण्यासाठी कृषी विपणन व निर्यात माहिती सेवाकेंद्र स्थापन करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

५) **शेतमाल फळे व भाजीपाला** यांचा दर्जा मागणीनुसार रहावा यासाठी आंतरराष्ट्रीय मानकानुसार सुविधा असणाऱ्या गुणवत्ता मानक प्रयोगशाळा स्थापन करणाऱ्या संस्थांना सहाय्य देण्यात येत आहे.

६) शेतमालाच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी **हवाई खर्चावर अनुदान देण्यासाठी** तरतुद करण्यात आली आहे.

७) प्रामुख्याने निर्यातीचा अनुभव घेण्याकरिता शेतमालाची पारंपारिक बाजारपेठात प्रायोगिक स्वरुपात निर्यात करण्यासाठी **शेतमाल निर्यात करणाऱ्या संस्थांना अनुदान** देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**सरकारी धोरण कृषी विकास यातील सहसंबंध :-**

सरकारी धोरण हे खऱ्या अर्थाने कृषी विकासाला अनुकूल असले तर निश्चितपणे अपेक्षित कृषीविकास घडवून आणता येतो. मात्र याला सामुहिक प्रयत्नाची जोड आवश्यक असते. १९५० साली भारत प्रजासत्ताक झाला आणि प्रजेच्या हाती सत्ता आली. परंतु २००० साल उजाडले तरी खऱ्या अर्थाने ती सत्ता तालुका व गावापर्यंत पोहोचली नव्हती. जिल्हापरिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत सत्तेच्या केंद्रीकरणामुळे शासकीय यंत्रणेचा भाग बनल्या होत्या. स्थानिक उपक्रमशिलता आणि कर्तुत्व यांना वाव नव्हता. प्रत्येक गांव जर स्वयंपूर्ण प्रजासत्ताक झाले तरच झपाट्याने कृषी विकास होऊ शकेल. कारण यामुळे स्थानिक नेतृत्वाला, उपक्रमशीलतेला आणि कर्तुत्वाला भरपूर वाव मिळून ग्रामविकासा सोबतच कृषी विकासाला स्पर्धात्मक चालना मिळेल असा विचार करुन १९९३ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीनुसार प्रजासत्ता स्थानिक संस्थाकडे सोपविण्याचा मार्ग मोकळा झाला.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र राज्यात घटनेनुसार अपेक्षित लोकशाही अस्तित्वात आणण्याचा निर्णय २६ सप्टेंबर २००० रोजी घेण्यात आला व २ ऑक्टोबर २००० या दिवशी महाराष्ट्र शासनाच्या ९ विभागाच्या १२२ योजना जिल्हापरिषदेकडे सोपविण्यात येऊन प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रदान करण्यात आले. या निर्णयामुळे मंत्रालयाचे आणि तेथिल कार्यकारी अधिकाऱ्यांचे, कार्यवाही व निर्णय घेण्याचे अधिकार आता जिल्हापरिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत अशा पंचायत राज संस्थांकडे सुपुर्द करण्यात आले आहे.

या सरकारी धोरणाचा असा परिणाम झाला आहे की, आता प्रत्येक ग्रामवासी त्याला पाहिजे ती माहिती मिळवू शकतो. महत्वाचे निर्णय घेणाऱ्या सत्तास्थानाशी संपर्क ठेऊ शकतो. स्वतः निवडून दिलेल्या प्रतिनिधींना त्यांच्या कार्याबाबत उत्तरदायी ठरवू शकतो. जर ग्रामवासी एकत्र झाले, संघटित झाले तर त्यांच्या गावाला ज्याची सर्वात जास्त गरज आहे. अशा समस्या अग्रक्रमाने सोडविण्याचा ते निर्णय घेऊ शकतात. स्तःच्या हक्काविषयी जागरूक राहून दिलेल्या पर्यायामधून कोणत्या योजना गावासाठी उपयुक्त ठरु शकतील ते ठरवू शकतात. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद यात प्रतिनिधीत्व करणाऱ्यांना गावास गरज असलेल्या योजना आणि कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्यास भाग पाडू शकतात. आज आवश्यकता आहे ती ग्रामवासीयांना त्यांच्या या सामर्थ्याची जाणीव करुन देण्याची प्रस्तुत लेखाचा हाच मूळ उद्देश आहे. एकदा गावकऱ्यांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव झाली की, त्यांचा प्रमुख असलेला कृषीव्यवसाय कसा वाढीस लागेल या दृष्टीने ते निश्चितच सामूहिक व वैयक्तिक प्रयत्न अवश्य करतील. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयानुसार ग्रामवासी स्वतःच्या अधिकाराचा वापर करुन शिक्षणाची अधिक चांगली सोय, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सार्वजनिक स्वच्छ ता, आरोग्य, कुटुंबकल्याण, नसीकरण, बालसंगोपन, बालपोषण, पशुपालन, शेतीच्या सुविधा आणि सांस्कृतिक विकास या सर्वांना साकार करु शकतात. या सर्वांचा आधार कृषीविकास आहे हे जाणून त्यादृष्टीने फक्त प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. याकरिता ग्रामवासीयांनी आता ताबडतोब संघटित व्हावे. आपापसातील मतभेद दूर सारावेत खांद्याला खांदा लावून विकासाच्या संकल्पनेने झपाटण्याची उड्डान अवस्था आली आहे. परिस्थिती अनुकुल होत चालली आहे तिचा फायदा वेळीच घेण्यात आला तर कृषीविकासासोबतच ग्राम विकास आणि ग्रामविकासासोबतच कृषी विकास असे अनुकूल विकासचक्र सुरु होईल.

## कृषीविकासाकरिता लोकचळवळ निर्मिती :-

"आम्ही तुम्हाला मदत करतो परंतु तुमचा विकास तुम्हीच घडवून आणू शकता." हे सूत्र महाराष्ट्र राज्य शासनाने स्वीकारुन त्यादृष्टीने प्रयत्न सुरु केले. ग्रामवासीयांनी जाती, पंथ, मतभेद विसरून ग्रामविकासाकरिता संघटित व्हावे व आपला विकास घडवून आणावा म्हणून "संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान" आणि "राष्ट्र संत तुकडोजी महाराज स्वच्छग्राम" स्पर्धा हे उपक्रम २ ऑक्टोबर २००० पासून सुरु केले. प्रोत्साहनपर आकर्षक बक्षीसे याकरिता ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक गावाने यात भाग घेतल्यास गावा-गावात विकासाच्या दृष्टीने स्पर्धा निर्माण होऊन मरगळलेल्या ग्रामजीवनाला चैतन्याची नवपालवी

Scanned by CamScanner

फुटेल. कृषीविकासाकरिता व ग्रामविकासाकरिता लोकचळवळ निर्माण होईल. गावोगावी होणाऱ्या या स्पर्धांमुळे संघटित होऊन काम करण्याची गावकऱ्यांना सवय लागेल व गावातील कित्येक समस्या गावपातळीवरच गावकऱ्यांच्या सहकार्याने दूर होतील. ही यामागील प्रेरणा आहे.

**कृषीविकासाकरिता सरकारी योगदान व त्यांचा वापर :-**

असे म्हणतात, ''बुडत्याचे पाय खोलाकडे,'' ज्या व्यवसायाच्या आधारावर एकेकाळी या भारतात सोन्याचा धूर निघत होता. त्या व्यवसायाची प्रतिष्ठा आज पार धुळीला मिळाली आहे. सरकारी नोकऱ्यांचे आकर्षण, शहरातील बेगडी सौंदर्य, कमी श्रमात धनवान बनण्याच्या क्लृप्त्या, चुकीचे शैक्षणिक धोरण या सर्वांच्या परिणाम स्वरूप कृषी व्यवसायाकडे आमचे अक्षम्य दूर्लक्ष झाले आहे. वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करुन देण्याची क्षमता या व्यवसायात निश्चितपणे आहे. गरज आहे ती या व्यवसायाला पूर्वीची प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याची. गावातील लोकसंख्या गावातच राहिली पाहिजे. एवढेच नव्हे तर शहरातील लोकांना गावाने आकर्षित केले पाहिजे. हे शक्य आहे या अपेक्षांच्या पूर्ती करिता पारंपारिक शेती पद्धतीत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. आज बहुसंख्य शेती ही केवळ जमीन, श्रमशक्ती व पारंपारिक साधनसामुग्री या आधारावरच केली जाते. अपूरा व अनिश्चित पाणी पुरवठा, अत्यल्प भांडवल आणि तेही कर्जाऊ, नियोजनाचा अभाव, निकृष्ठ बी-बियाणांचा वापर, खते, औषधे यांचा अभाव, आधुनिक संसाधनांचा वापर नसणे, संघटितपणाचा अभाव, अकुशल नेतृत्व, अज्ञान, संशोधनाची माहिती नसणे, प्रोत्साहनाचा अभाव, पडेल बाजारभाव, नियंत्रण नसणे, कुशल व्यवस्थापनाचा अभाव या सारख्या असंख्य समस्यांनी ती वेढलेली आहे.

**भारतीय शेतीत दोन प्रमुख प्रवृत्ती दिसून येतात :-**

१) नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन भरभराटीस आलेला शेतकरी वर्ग जो नफ्याच्या आशेने शेती करीत आहे. शेतीला उद्योग समजून आधुनिक व्यवस्थापनाचा उपयोग करीत आहे. त्यांच्याजवळ भरपूर जमीन आहे. आवश्यक तेवढे भांडवल आहे. ज्यांच्याजवळ नाही त्यांना ते उभारण्याची कला अवगत आहे. भांडवलाच्या आधारे त्यांना पाहिजे तेवढी श्रमशक्ती ते उभारु शकतात. त्यांच्याजवळ संघटन आहे. योग्य बाजार भाव मिळेपर्यंत ते वाट पाहू शकतात. संग्रहणगृहांचा, शित गृहांचा, शित वाहनांचा ते वापर करतात, त्यांना बाजारपेठेचे ज्ञान आहे. उत्कृष्ठ व्यवस्थापन असल्यामुळे नियोजन, नियंत्रण, समन्वयन वितरण ते व्यवस्थितपणे साधू शकतात. पाणीपुरवठा, बी-बियाणे, खते औषधे, आधुनिक यंत्र सामुग्री या सर्वांची त्यांनी व्यवस्था केली आहे. आपल्या या व्यवसायातील गुंतवणुकीचा पुरेपूर मोबदला ते प्राप्त करीता आहे. लाभदायक पिके घेऊन, त्यांनी कृषीमालाची निर्यात करणे देखील सुरु केले आहे. कृषीविकास घडवून आणता येतो हे त्यांनी दाखवून दिले आहे. या सर्वात महत्वाचे म्हणजे सरकारी योजनांचा व धोरणांचा ते जास्तीत जास्त फायदा घेत आहेत. सरकारी धोरणे आपल्या व्यवसायाकरिता राबवून घेत आहेत.

२) दुसरीकडे केवळ निर्वाहाकरिता शेती करणारा वर्ग असून निर्वाहापुरते उत्पन्न मिळाले तरी तृप्त राहणारा असा आहे. हा असंख्य गरीब, लहान असमर्थ शेतकऱ्यांचा वर्ग आहे. हा बहूसंख्यांचा वर्ग उत्पादनवाढीकरिता इच्छुक असला तरी नव्या आदानांचा योग्य वापर करण्याच्या परिस्थितीत तो नाही. या

Scanned by CamScanner

वर्गाच्या बाबतीत असे आढळून येते की, कुटुंबाच्या निर्वाहासाठी अडचणीच्या परिस्थितीत मिळेल त्या किंमतीवर तो शेतमाल विकत असतो त्यामुळे बहुतेकवेळा अनुकूल व्यापारतोल साधला जात नाही. एकीकडे गुंतवणुकीच्या तुलनेत उत्पादन कमी आणि दुसरीकडे पडता बाजारभाव अशा परिस्थितीत कृषीविकास साधणार कसा? या सर्वांच्या परिणामस्वरुप तो उत्पादन वाढ करु शकत नाही कारण उत्पादनक्षमता वाढवू शकत नाही. या वर्गाला किंमतीची प्रेरणा वा नफ्याची प्रेरणा कार्यप्रवृत्त करु शकत नाही. केवळ जमीन या उत्पादक घटकाकडूनच उत्पादनवाढीचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर होत असतो. जमीन पर्यायी घटकांच्या वाढत्या महत्वाची जाण या वर्गाला असत नाही. ही जाण एखादेवेळी करुन देण्यात आली तरी त्यानुसार कार्य करण्यास वैयक्तिक पातळीवर हा वर्ग असमर्थ आहे.

सारांशरुपाने एवढेच सांगता येईल की, पारंपारिक शेती, पारंपारिक मनोवृत्ती बदलवून शेती व शेतकरी यात आमुलाग्र बदल होणे व त्याला कृषीविषयक सरकारी धोरणांची साथ मिळणे यावरच कृषीविकास अवलंबून आहे. वैयक्तिक पातळीवर सरकारी धोरणांचा जर शेतकरी लाभ घेऊ शकत नसेल तर त्याने संघटित होणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने सर्वांचा प्रामाणिक सहभाग, सामुहिक प्रयत्न, त्याला योग्य व कुशल नेतृत्वाची जोड , विकासाची जिद्द, अथक परिश्रम या सर्वांचे संघटन होणे आवश्यक आहे. आपापसातील मतभेद, वैर. व्देष, घृणा, तिरस्कार या सर्वांतून ग्रामवासीयांनी वर उठणे आवश्यक आहे. कृषीची पुर्नरचना करणे, नवीन नियम तयार करणे, त्याचे सर्वांनी पालन करणे, जीवनावश्यक गरजा वगळता इतर खाजगी गरजा लांबणीवर टाकणे, परस्परांना मदत करणे यातुनच कृषीविकास साधू शकतो. मजूरीचा विचार न करता केले जाणारे कष्ट अधिक उत्पादन निर्माण करु शकतात हे येथे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. **शेती व्यवसायात उत्पादन घटकांचा मेळ, उत्पादनाचा मेळ, स्थानिकीकरण, खरेदी-विक्री बाबत निर्णय या मुद्यांचा सुरेख समन्वय आवश्यक आहे. शेतकरी जर संघटित झाले व सामुहिक प्रयत्न करु लागले तर अपेक्षित कृषीविकास सहज शक्य आहे.**

सरकारी धोरण कधी नव्हे इतके आज अनुकूल झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायतता प्रदान करण्यात आली आहे. सर्व निर्णय ग्रामपातळीवरच घेणे शक्य आहे. उड्डाणावस्था निर्माण झाली आहे. आता खडबडून उठायलाच पाहिजे. दूर्दम्य महत्वाकांक्षेने झपाटलेच पाहिजे, स्वाभिमान जागृत झालाच पाहिजे. स्वयंपूर्णतेचा ध्यासलागलाच पाहिजे. 'आनंदवनाच्या' विकासाचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. आनंदवन हे नागपूर-चंद्रपूर मार्गावर वरोऱ्यापासून ५ किलो मीटर अंतरावर देशाच्या स्वातंत्र्यानंतर वसलेले गांव. ग्रामवासी महारोगासारख्या व्याधीने ग्रस्त असतांनाही केवळ श्री बाबा आमटे यांच्या कुशल नेतृत्वाने व मार्गदर्शनाने मि स्वयंपूर्ण गांवात रुपांतरित झाले आहे ते त्यांच्या कृषीविकासाच्या आधारावरच. मित्रांनो उठा गावपातळीवर संघटित व्हा. कुशल नेतृत्वाचा शोध घ्या, सरकारी धोरणांना सक्रीय प्रतिसाद द्या. चला कामाला लागा. यश तुमची वाट पाहत आहे.

❋❋❋

Scanned by CamScanner

प्रा. व्ही. बी. पाठक
प्रा. संजय भेंडे
नागपूर.

# भारताचे नवे आर्थिक धोरण व त्याचा भारतीयावर झालेला परिणाम

**नवें आर्थिक धोरण -**

आर्थिक सुधारणा, अर्थ व्यवस्थेतील बदल याला नवे आर्थिक धोरण असे नांव दिले जाते. जागतीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, असे संबोधले जाते. उत्पादन तंत्रांची आयात, विदेशी भांडवलाचा स्वीकार, बहुराष्ट्रीय कंपन्याचा प्रवेश हा अर्थ व्यवस्थेतील परिवर्तनाचा परिणाम आहे.

**नवीन अर्थ व्यवस्थेची तीन कारणे आहेत-**

(१) अपुरे भांडवल (२) प्रचंड बेकारी व त्यातून गरीबी (३) तंत्रज्ञानातील त्रुटी

**लघुउद्योगावर प्रभाव -** भारतातील लघू उद्योग १.७ कोटी रोजगार पुरविते तर यातून उत्पादन ३५% निर्यात होते. नवीन आर्थिक धोरणामुळे लघू उद्योगावर परिणाम झाल्याने, अर्थ व्यवस्थेवर आघात झालेला दिसून येतो. लघुउद्योग श्रमप्राधान्यावर आधारीत आहे. छोटे लघु उद्योग नवीन आर्थिक धोरणामुळे आपले रक्षण करु शकत नाही. कारण बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करणे कठीण आहे. लघुउद्योग तीन प्रकारे भारत मातेची सेवा करतात. नव्या क्षेत्रातील उद्योगाचा विकास करतात, नवीन रोजगार निर्मिती करतात. नवीन प्रगतीचे स्त्रोत लघुउद्योग आहेत. जागतिक भांडवलदार कर्ज देऊन नव्या क्षेत्रातील उद्योगांना कर्ज बाजारी बनवितात व उद्योगातील रोजगार बंद करवितात. लघुउद्योगांना लायसन्स मिळणेही कठीण आहे. भांडवलदारांना वित्तसहाय्य देऊन बेरोजगारीत वाढ होत आहे. कामगार कमी करण्याऱ्यांना कर लावणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणांचा फायदा मोजक्या लोकांना होत आहे. मोठे उद्योगपती बहुराष्ट्रीय कंपन्याना प्रोत्साहन देत आहे.

**बेरोजगारांचा प्रश्न -** अर्थ व्यवस्थेच्या जागतीकरणानंतर विकास कामे, मुलभूत सोयी निर्माण करण्याची कामे सरकारने करण्याऐवजी कंत्राटीपद्धतीने सरकारी कामे केली जात आहेत. भ्रष्टाचारी वृत्ती यामुळे वाढत आहे. खाजगीकरणामुळे रोजगार कमी होत आहे. घरगुती उपकरणे, उपभोग्यवस्तू याची बाजारपेठ काबीज करण्याची बहुराष्ट्रीय कंपन्यांची योजना आहे. कमी पैशात पूर्ण शोषण केल्या जात आहे. कोलगेट.

Scanned by CamScanner

कोकाकोला सारखी उत्पादने लोकप्रिय होत आहे. तर भारतीय वस्तुला ग्राहक मिळणे कठीण झाले आहे. कॅडबरी, हिंदुस्थानलीव्हर , रॅलीफॅन, मर्फी बुश, यांनी नोकरवर्ग कमी करून ३० ते ५०% काम कंत्राट पद्धतीने सुरु केले आहे. यामुळे बेकारांच्या प्रमाणात वाढ होणार आहे.

**लघुउद्योगांना सवलती -** पंतप्रधान अटलबिहारी यांनी ३० ऑगस्ट २००० ला लघुउद्योगाकरिता सवलती जाहीर केल्या, उद्देश हा की जागतीक स्पर्धेत उत्पादन येण्यास मदत होईल. उत्पादन शुल्कात सूट दिली असून ५० लाखावरून १ कोटी पर्यंत शुल्क माफ केले आहे. इन्स्पेक्टर राज संपुष्टात आणले आहे. हातमाग क्षेत्रासाठी ४४७ कोटीच्या सवलती जाहीर केल्या. लघुउद्योगांना कर्ज मर्यादा १० लाखावरून २० लाख करण्यात येईल. कालबाह्य कायदे रद्द केले जातील. नवीन कायदे करण्यासाठी तज्ञाची समिती नियुक्त करण्यात येईल, एकूण निर्यातीपैकी ४०% निर्यात लघुउद्योगातून होईल. नॅशनल इक्वीटी फंडाची मदत घेतली जाईल. दहा लाख कर्जाला कोरेटेल सिक्युरिटी मागणार नाही. लघुउद्योग मालकांना फौजदारी कारवाईला तोंड द्यावे लागणार नाही तर दंडात्मक कारवाई केली जाईल. लघुउद्योगावर आयकर ३८% तर विक्रीकर १५% व उत्पादनशुल्क १६ ते २४ % द्यावा लागतो. जकात कराचे सुलभीकरण करणे आवश्यक आहे. या सर्व करामुळे लघुउद्योग स्पर्धेत टिकत नाही.

**कृषी उद्योगावर प्रभाव -**

नवीन आर्थिक धोरणामुळे कृषी उद्योगावर प्रभाव पडलेला दिसून येतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा सबंध उत्पादनाशी आहे. उत्पादनाशी संबंधीत कामगार बाहेर पडत आहे.

ब्राझिलमध्ये साखर उद्योगात २३६ कामगारापैकी निम्मे कामगार उत्पादनात भर घालतात. भारतात साखर उद्योगात दहा हजार कामगार आहेत. या उद्योगात बेकारी वाढत आहे. गॅटकरार अनुच्छेद X X VIII (24) नुसार आयात कर लावलेले असल्याने निर्यात वाढणे कठीण आहे. नवीन आर्थिक धोरणाने गरीबी वाढणार आहे, पेटंट व जागतीकरणांचा प्रभाव कृषी उद्योगावर होत आहे.

**सार्वजनिक क्षेत्रात प्रभाव -**

भारतात आर्थिक संसाधन टंचाई, अपुरे भांडवल, सार्वजनिक विनिवेश धोरण आणले गेल्याने नफ्यांच्या कंपन्या विदेशी लोक खरेदी करणार. सार्वजनिक क्षेत्रात विनिवेश धोरणाला सुरवात झाली आहे.

परकीय गुंतवणूक, आर्थिक धोरणातील बदल आणि देशातंर्गत स्थैर्य यावर भारत व दक्षिण आशियात परकीय गुंतवणूक अवलंबून आहे असे मत संयुक्तराष्ट्र संघाच्या व्यापार व विकास परिषदेत जाहीर करण्यांत

Scanned by CamScanner

आले. परकीय गुंतवणूक १९९९ मधे दोन अब्ज सहाकोटी डॉलर एवढी घटली. बांगलादेशा १९९८ मधे ३० कोटी ८० लाख डॉलर होती. १९९९ मधे १५ कोटी डॉलरवर घसरली, पाकिस्तानमधे ५० कोटी डॉलरवर स्थिर झाली. जागतीक गुंतवणूक अहवाल २००० नुकताच प्रकाशित करण्यात आला यात भारत, रशिया, स्लेव्हेनिया, थायलंड , कंबोडीया या देशात आर्थिक धोरणात बदल झालेले दिसून आले विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहन दिले जात आहे.

## मनुष्य बळाची फेररचना अटळ

१९८०-९० या दशकात भारतातील सार्वजनिक उद्योगात रोजगार वाढीचा दर ५.७५% होता उदारीकरणानंतर १० वर्षांनी २.५% झाला खाजगी उद्योग क्षेत्रात रोजगार वाढीचा दर १.५% पेक्षा जास्त होता. आज ३९% एवढाच आहे. रोजगार वाढीस पोषक वातावरण नाही.

अर्थ व्यवस्थेचे उदारीकरण वा जागतीकरणाच्या काळात टिपिकल भारतीय संस्कृती ढासळली आहे उदासीन, अकार्यक्षम, कामाकडे नकारात्मक दृष्टीने पहाणारे आधुनिकरणामुळे अतिरिक्त ठरणारे मनुष्यबळ मर्व व्यवसायातून कमी केले जात आहे. भारतीय उद्योगातील मनुष्य बळाची फेररचना आवश्यक आहे. आपण नोकरी करतो त्या संस्थेला पालक मानणे, हितसंबंधात साम्य शोधणे , भरपूर काम करणे, गंभीरतेने काम करणे ही कार्य संस्कृती उदारीकरणामुळे नष्ट होत आहे.

नव्या तंत्रज्ञानाशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणारे कामगार कर्मचारी भरणे, उत्पादनखर्चातील पर्सोनल कॉस्टला कमी लावणे हाही भाग आहे. यादृष्टीने मनुष्यबळाची फेररचना आवश्यक व्यवसाय व्यवस्थापनाचे व्यवसायीकरण करणे आवश्यक. कमीतकमी कामगाराकडून दर्जेदार उत्पादन करणे आवश्यक. कर्मचारी घटवून उत्पादन खर्चाला नियंत्रण, संप, मोर्चे यांच्या चक्रातून दर्जेदार काम अपेक्षित. नोकरीत सुरक्षितता नाही. कार्यक्षम तंत्रज्ञान बनणे आवश्यक. यादृष्टीने तरूणपिढीने कार्य संस्कृतीसाठी मनोभूमिका तयार करणे आवश्यक. पर्सोनल कॉस्टला कमी करण्याकडे उद्योगाचे लक्ष मनुष्य बळाचे पुनर्नियोजन आवश्यक आहे. व्यवस्थापक कंपनीने धोरण राबविले पाहिजे.

## भारतीय उद्योगावर प्रभाव

उदारीकरणामुळे पददेशीवस्तू दर्जेदार व मुबलक (स्वदेशीची कमी उत्पदान खर्च नियमित करणे आवश्यक) दुचाकी वाहनाचे उत्पादन वाढल्याने बजाजने पाच दिवसाचा आठवडा केला. टेल्कोला २०००-२००१ या वर्षात एप्रिल - जून या महिन्यात ७४ कोटी तोटा झाला. यामुळे सात हजार कामगार कमी

Scanned by CamScanner

करण्याची योजना आखली जात आहे. टाटानी विनंती केली की औद्योगिक मंदीतून बाहेर येण्यासाठी उद्योगधंद्याना शासनाने मदत करावी. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ खर्च कमी करण्यासाठी ३६ हजार ४०० कर्मचाऱ्याची कपात करण्याची सूचना प्रॉडक्टीव्हीटी कौन्सीलने केली. म्हणून वीज मंडळाचे विभाजन करण्यात यावे अशी शिफारस करण्यांत आली. त्याचा परिणाम वीज बिले न भरणाऱ्या ग्राहकावर कारवाई होत आहे. वीजचोरी विरूद्ध दक्षतापथक आहे. बँकामधे कर्मचारी कपातीच्या गोल्डन शेकहॅण्ड योजना खाजगी बँकाशी स्पर्धा केंद्र सरका मालकीच्या उद्योगाचे खाजगीकरण तोटच्यात चालणाऱ्या सरकारी कंपन्या नॅशनल बॉयसिकल कारपोरेशन वेबर्ड इंडिया, टॅनरी फुटवेअर कारपोरेशन इ. सहा कंपन्या केंद्र सरकार बंद करीत आहे. मारूती मोटर कंपनीचे खाजगीकरण केले जात आहे.

### खादी उद्योगावर प्रभाव

सरकार खादी उद्योगात सूट देण्याचा विचार करीत आहे. खादी उद्योग कपडा क्षेत्रात स्पर्धा करू शकत नाही. १४ लाख कामगार खादी उद्योगात आहे. खादी कपडा घालण्याची प्रवृत्ती कमी त्यामुळे १० लाख कामगार बेरोजगार होणार.

मुंबई गोदीत ३० हजार कर्मचारी १४ हजार अतिरिक्त मुंबई पोर्ट ट्रस्टने ७०० कोटीची स्वेच्छा निवृत्ती गोदी उद्योग ७०% वेतनावर खर्च इतर गोद्यामधे ३०/३५ टक्के खर्च सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ५८ करण्याची शिफारस आहे.

### पाचव्या वेतन आयोगाचा प्रभाव

पाचव्या वेतन आयोगामुळे केंद्राने ३० टक्के कर्मचारी कपात करण्याचे धोरण ५५ व्या वर्षी सेवानिवृत्तीच सर्वे करण्यात आला. महाराष्ट्रातील 'अ' वर्ग नगरपालिका पाणी पुरवठा व मल निसारण खाजगी क्षेत्राला देण्यात येत आहे.

महाराष्ट्रात ४६ हजार सहकारी संस्था पैकी ४८% संस्था तोटच्यात आहेत. त्यामुळे मनुष्यबळाची फेररचना करणे अपरिहार्य झाले आहे.

महाराष्ट्र, राजस्थान, म. प्र. मधे कंत्राटी शिक्षक याप्रमाणे राबविला जात आहे.

एकूण खाजगी, सहकारी, निमशासकीय संस्था मनुष्य बळाची फेररचना आवश्यक आहे. संगणकीकरण व आधुनिकरणामुळे ४५ वयाचे कर्मचारी उद्योग व्यवसायात निरूपयोगी त्यामुळे स्वेच्छा निवृत्ती अपरिहार्य आहे.

Scanned by CamScanner

बदलत्या कार्य संस्कृतीत सामोरे जातांना निर्माण होणाऱ्या सामाजिक व आर्थिक प्रश्नाचे व्यापक आकलन होणे आवश्यक आहे.

**शासनाची चुकीची भूमिका**

अर्थ व्यवस्थेवरील शासनाची भूमिका कमी करणे आवष्यक आहे. सारीच सत्ता बाजाराच्या हाती सुपुर्द करणे हा त्यांचा अर्थ नव्हे. शासनाचे जादा क्षेत्रातील केलेल्या इमल्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे त्यामुळे शासनाची चौकट खिळखिळी होणे थांबणार आहे.

भिष्मानी शांती पर्वात म्हटले आहे की घोड्याला लगामाच्या सहाय्याने, हत्तीला अंकुशाच्या सहाय्याने नियंत्रणाखाली ठेवता येते. अधिसत्तेखाली असलेल्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

मनुस्मृतीत म्हटले आहे की ज्यांना शासन करायचे आहे त्यांनी शिक्षा देण्याचे कार्य करावे नाहीतर तव्यावर माश्या शेकल्यासारखे होईल. बलशाली वर्ग दुर्बलावर राज्य करील.

वड्या उद्योगांनी ब्रिटीशांशी सहकार्य केले त्याचा फायदा उद्योगांना झाला. जमशेट जी टाटा ब्रिटीशांना अनुकुल होते. सरकारी उद्योगातून भांडवल काढण्याची भूमिका परकीय गुंतवणूकदारांना फायद्याची आहे. १९९० च्या दशकात लॅटीन अमेरिकेत हेच झाले म्हणून त्यांना हे शतक वाया गेल्यासारखे वाटते. तसेच भारतालाही वाटत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कामगारांनी प्रथम संप नंतर गैरवर्तणुकीमुळे कंपन्या बंद होत आहेत. अशा कामगारांना सरकारने स्वैच्छानिधी देय केली आहे. याचा फटका सामान्य लोकांवर बसत आहे. लोकावर कर लावले जात आहे. हे शासनाचे चुकीचे धोरण आहे. जागतीकरणामुळे स्वदेशींची चळवळ मागे पडत चालली आहे.

Scanned by CamScanner



*प्रा. राजाभाऊ दुरगकर*
नवप्रतिभा कनिष्ठ महाविद्यालय,
मिरची बाजार, नागपूर.

# बदलते आर्थिक धोरण व कृषी व्यवसायावरील परीणाम

जागतिक व्यापार संघटनेच्या १५ एप्रील १९९४ च्या करारावर सही करून भारत सरकारने संपूर्ण देशाचे सार्वभौमत्व विदेशाकडे गहाण टाकलेले आहे.

३० एप्रील २००० रोजी केंद्रसरकार तर्फे घोषित करण्यात आलेल्या आयात निर्यात धोरणामुळे सामान्य जनता, श्रमिक वर्ग, भारतीय शेतकरी तसेच भारतातील लघू उद्योग व कुटीर उद्योग यांचेवर काही अवधी नंतर भीषण दुष्परिणाम दिसून येणार आहेत. नवीन धोरणामुळे भारतीय शेतकऱ्यांना शेती करणे अतिशय कठीण जाणार असून श्रमिकांना बेकारीच्या खाईत लोटले जाणार आहेत. प. पु. महात्मा गांधींच्या तत्वांना नवीन आर्थिक्र धोरणांमुळे पुर्ण काळीमा फासला जाणार आहे. नवीन आयात धोरणामुळे देशातील लघू, कुटीर, कृषी उद्योग नष्ट होऊन आधीच्याच बेकारीत प्रचंड वाढ होऊन सामाजिक असंतुलन निर्माण होण्याची भिती व्यक्त केल्या जात आहे. व हे पद्धतशीर कट कारस्थान जागतिक बहुराष्ट्रीय कंपन्या अमेरिकेच्या सहकार्याने करीत असल्याचे स्पष्ट होते. विश्व व्यापार संघटनेच्या करारात भारतीय शेतीला घातक तरतुदी करण्यात आल्या आहेत. डंकेल, गॅटचे नवे स्वरूप म्हणजे विश्व व्यापार संघटन होय.

आवश्यकते प्रमाणे आयात करणे हा खरा स्वाभिमान व त्यामुळे सार्वभौमत्व अबाधीत राहू शकते. करारानंतर भारत सरकार बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या २७०० वस्तुवर सुट देण्याचा विचार करीत असून यापैकी १४२९ वस्तुवर आयाती बाबत पुर्वीच कडक निर्बंध घातले होते. हे निर्बंध २००३ पर्यंत उठविण्याची मर्यादा असून ही २८ डिसेंबर १९९९ ला निर्बंध हटविण्याच्या करारावर सही करून ते तातडीने लागू केले. त्यामुळे देशाला ज्या वस्तुंची गरज नाही, अशा वस्तू भारतात येणार आहेत.

उपरोक्त वस्तुंच्या आयातीवर सरकारने मात्रात्मक प्रतिबंध (Quantititive Restriction) कायम ठेवून भारतीय बाजारपेठेत विदेशी वस्तुंचे डम्पींग होणार नाही याची काळजी घ्यावी. डम्पींग याचा अर्थ असा की आपल्या देशातून विकल्या जाणारा माल (वस्तू व सेवा) सामान्य किंमतीपेक्षा कमी ठेवून दुसऱ्या देशात पाठविणे व त्या देशाची आर्थिक कृषी अर्थव्यवस्था कमजोर करणे. कराराची भाषा डम्पींगचा विरोध करणारी असली तरी जगातील प्रगत राष्ट्रे आपल्या देशातील कृषी उत्पादन मालाचे दुसऱ्या देशात डम्पींग करीतच आहे.

Scanned by CamScanner

डम्पींग विरोधी करारापासून अमेरिकेने सुरूवाती पासून स्वतःचा पद्धतशीतपणे बचाव करण्याचे प्रयत्न केलेत. ८ डिसेंबर १९९४ ला अमेरिकेने **'उरूग्वे राउंड अॅक्ट '** कायदा पास करून स्वतःला जागतिक व्यापार संघटनेच्या करारातील अटी पासून सुरक्षित ठेवले व तीच अमेरीका या अटीच्या माध्यमातून विकसनशील देशांना आर्थिक गुलामगिरीत ढकलण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करीत आहे.

विकसनशील देशात वस्तुचा उत्पादन खर्च व वस्तुच्या बाजार किंमती ह्या पुर्णपणे भिन्न मानून कराराच्या अटी ह्या देशांवर थोपविल्या आहेत. ज्यामुळे भांडवलदार देशातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक सहायता तृतीय देशातील सरकारच्या नजरेतून वगळल्या जाउन या देशातील कृषी व्यवसाय तोटच्यात येवून समाप्त होतील व त्या देशांच्या बाजारपेठेवर भांडवलदार देशाची आर्थिक पकड मजबुत होईल.

वस्तुची किंमत ठरविण्यासाठी कोणत्याही वस्तुंचा उत्पादन खर्च हा महत्वाचा असतो. पाश्चिमात्य विकसीत राष्ट्रातील कृषीमालाचा उत्पादन खर्च भारतापेक्षा बराच जास्त आहे. परंतु तेथील सरकारव्दारे शेतकऱ्यांना भिन्नविभिन्न प्रकारच्या आर्थिक सहायता देत असल्याने तेथील शेतकऱ्यांना कृषी उत्पादनात तोटा येत नाही. प्रगत देशातील सरकारांकडून त्या देशातील शेतकऱ्यांना ग्रीन बॉक्स तसेच ब्लू बॉक्स या अंतर्गत जे आर्थिक सहाय्यप्रदान केले जाते. ते जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार माफ आहे. ग्रीन बॉक्स अंतर्गत कृषी संशोधन व प्रशिक्षण, निर्यातीत वस्तुत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सहाय्य, किड नियंत्रण कार्यक्रम, पिक विम्यात सरकारचा हिस्सा, इत्यादी समावेश होतो तर ब्लू बॉक्स मध्ये कृषी उत्पादनास नियंत्रित ठेवण्यासाठी देण्यात येणारी सबसिडी अंर्तभुत होते. याशिवाय आधारभूत किंमतीवर (minimum support price) सरकारव्दारे कृषी उत्पादनाची खरेदी करून सहाय्य प्रदान करणे याला अंबर बॉक्स म्हटल्या जाते.

ग्रीन बॉक्स व अंबर बॉक्स माध्यमातून जी सहाय्यता प्रगत राष्ट्रे शेतकऱ्यांना देतात ती जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार माफ आहेत त्यामुळे शेती व्यवसायात कोणत्याही प्रकारचा तोटा होत नसल्याने जागतिक व्यापार संघटनेचे म्हणणे आहे. परंतु उपरोक्त प्रकारची आर्थिक सहाय्यता ही केवळ प्रगत राष्ट्रे शेतकऱ्यांना देत असतात. सहाय्य देण्याची ही क्षमता विकसनशील अथवा अविकसित राष्ट्रांमध्ये नाही. प्रगत राष्ट्रे आपल्या देशातील शेतकऱ्यांना कृषी उत्पादनाची निर्यात करण्यासाठी वेगवेगळी सहाय्यता देतात. त्या भरवशावरच तेथील शेतकरी आपला माल दुसऱ्या देशामध्ये सामान्य किंमतीपेक्षा कमी किंमतीत विकू शकतात.

भारतात सरकारतर्फे जी भांडवली व वित्तीय सहाय्यता वेगवेगळ्या स्वरूपामध्ये दिली जाते. ती आवश्यकतेपेक्षा बरीच कमी असल्याचे दिसते. जी दिल्या जात आहे ती २०००-२००१ च्या बजेटमध्ये कमी करण्यात येणार आहे.

डॉ. वंदना शिवा यांनी लिहिलेल्या 'भारतीय कृषी एवंम स्वतंत्रता का अपहरण' या पुस्तकातील माहितीवरून प्रगत देशामध्ये शेतीला ३५३ बिलीयन डॉलर म्हणजे जवळजवळ १७ लाख कोटी रूपयांची

Scanned by CamScanner

सबसिडी (आर्थिक सहाय्य) दिल्या जाते, तर भारतात केवळ २५०० कोटी रूपयांची ऋणात्मक सबसिडी दिल्या जाते, अमेरिकेतर्फे तेथील शेतकऱ्यांना देण्यात येणारी सबसिडी उरूग्वे राउंड अॅक्ट १९९४ नंतर कमी होण्याऐवजी दुप्पट झाली आहे, व हा कायदा जागतिक व्यापार संघटनेच्या करारातून पुर्णपणे मुक्त आहे, याउलट भारतात शेती व्यवसायाला देण्यात येणारी सबसिडी आणखी कमी करण्यावर भर देण्यात येत आहे, भारत सरकारने डिझेल खत विज व कर्जे इत्यादी वर मिळणाऱ्या सबसिडीत कटौती केल्यामुळे या वस्तुंच्या किंमतीत वाढ घडून आली आहे तर दुसरीकडे मुक्त आयात धोरण स्वीकारल्यामुळे शेतमालाच्या किंमती मोठ्या प्रमाणात उतरल्या आहेत. या दोन्ही आघातामुळे भारतीय शेतकरी भीषण संकटात सापडला असून याचे गंभीर दुष्परीणाम त्याला सोसावे लागत आहेत.

भारतात मागच्या वर्षी सोयाबीनचे भाव पडले याचे कारण अमेरिकेचा सोयाबीन मोठ्या प्रमाणात भारतात आला, त्याचे भाव भारतातील भावापेक्षा कमी होते कारण अमेरिकन सरकार तेथील उत्पादकांना उत्पादन खर्चापेक्षा जास्त सबसिडी देत असल्याने अमेरिकन सोयाबीन स्वस्त दरात भारतात आला.

अमेरिकेत सोयाबीनचा भाव प्रति टनास १५५ डॉलर आहे तर अमेरिकन सरकार प्रति टनास १९३ डॉलर सबसिडी देत आहे. त्यामुळे जास्त सबसिडी असलेला सोयाबीन भारतात अल्प सिमा शुल्क लावून आल्यामुळे भारतातील सोयाबीनचे भाव सपाटून घसरले शेवटी नुकसान भारतीय शेती उत्पादकांचेच झाले.

१९९९-२००० ला भारतात शेंगदाणा फल्लीचे उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा अर्धेच झाले परंतु पाम तेलाच्या आयातीमुळे शेंगदाणा फल्लीचे भाव न वाढता उलट ते भाव कमी झाले. याचाच अर्थ असा की विदेशातून मोठ्या प्रमाणात अशाच पद्धतीने वस्तू भारतात येऊ लागल्या तर भारतीय शेती उत्पादकांना आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय असू शकणार नाही.

भांडवलदार आपली कृषी उत्पादने विकसनशील देशापेक्षा स्वस्त ठेवून त्यांच्या बाजारपेठावर आपली सत्ता अबाधीत राहील अशी व्यवस्था करीत आहेत. परिणामतः मुक्त आयात धोरण भारतीय कृषी अर्थव्यवस्थेसाठी विनाशकारी सिद्ध होईल.

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेऊन अमेरिका सरकार ज्या विविध प्रकारच्या आर्थिक सहाय्यता आपल्या शेतकऱ्यांना देतात; तशाच प्रकारच्या आर्थिक सहाय्यता भारत सरकारने आपल्या शेतकऱ्यांना द्याव्यात. अन्यथा जागतिक व्यापार संघटनेच्या करारातून बाहेर पडणेच चांगले राहील. भारत सरकारने याकडे दुर्लक्ष केल्यास पायाभूत अर्थनिती धोक्यात येणार आहे.

Scanned by CamScanner



**डॉ. सौ. मेधा प्रशांत कानेटकर**
(एम् कॉम, एम.ए. (अर्थ) एम्.फिल्.पी.एच.डी.)
सी.पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय
नागपूर.

# भारताची राजकोषीय व्यवस्था
# (Fiscal System of India)

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेनुसार भारताने संघराज्य पद्धतीचा अंगीकार केला. संघराज्य व्यवस्थेत एका सार्वभौम केंद्रीय सत्तेच्या अधिपत्याखाली निरनिराळी राज्य सरकारे कार्यरत असतात. भारतात संघराज्य व्यवस्थेंतर्गत केंद्रीय स्तरावर केंद्र सरकार, राज्य स्तरावर राज्य सरकारे आणि स्थानिक स्तरावर स्थानिक अधिकारिणी कार्यरत आहेत. अशाप्रकारे त्रिस्तरीय सरकारे भारतात निर्माण करण्यात आली आहेत. प्रत्येक सरकारचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. त्या त्या कार्यक्षेत्रापुरती त्या-त्या सरकारांना स्वायत्तता देण्यात आली आहे. परंतु स्थानिक सरकारवर राज्य सरकारचे आणि राज्य सरकारवर केंद्र सरकारचे नियंत्रण आहे. देशात घडणाऱ्या सर्व चांगल्या-वाईट घटनांसाठी केंद्र सरकार जबाबदार असते. त्यामुळे आवश्यकता भासल्यास कनिष्ठ सत्तेचे अधिकार केंद्र सरकार कमी करते. ज्या बाबी जास्त महत्वपूर्ण आणि देशहिताच्या दृष्टीने आवश्यक आहेत त्या मुख्यत्वे केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहेत. भारतात एकापेक्षा जास्त सरकारे कार्यरत आहेत. या सर्व सरकारांचे कार्यक्षेत्र आणि अधिकार भारतीय राज्यघटनेनुसार निश्चित केले आहेत. त्यानुसार राष्ट्रीय संरक्षण, सेवादल, केंद्रीय अधिकोष इत्यादी बाबी केंद्र सरकारच्या अधिकारात आहेत. शेती, सहकार, अंतर्गत व्यवस्था, आरोग्य, शिक्षण, जलसिंचन इत्यादी बाबी राज्यसरकारच्या अधिकारात आहेत आणि ग्रामसफाई, जन्ममृत्युची नोंद, पाणीपुरवठा यासारख्या बाबी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे आहेत.

काही कार्यक्षेत्रे केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांच्या कक्षेत येतात. त्यात तांत्रिक शिक्षण, शास्त्रीय संशोधन, वाहतुक इत्यादी बाबी आहेत. या कार्यक्षेत्राबाबत अंतीम निर्णय मात्र केंद्रसरकार घेते. वरील कार्य करण्यासाठी केंद्रसरकार राज्य सरकारांना अनुदान देऊन त्यांच्याकडून ठराविक कार्ये करवून घेते. संघीय राज्यव्यवस्थेनुसार भारतात कार्यक्षेत्राबरोबरच वित्तीय क्षेत्राची देखिल विभागणी झालेली आहे. असे असूनही अनेकदा संकटकाळी भारतातील वित्तीय निर्णय केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांनी संयुक्तपणे घेतलेले आहेत.

भारतात राज्यघटनेला सर्वोच्च स्थान आहे. भारताचे संविधान अत्यंत महत्वाचे आहे. या संविधानात केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या वित्तीय अधिकारांच्या सीमारेषा स्पष्ट केल्या आहेत. राजकोषीय क्षमतेत बदल झाला तरी देखिल त्या राज्याबाबत राज्यघटनेतील तरतुदीत बदल केल्या जात नाही.

Scanned by CamScanner

केंद्र आणि राज्य सरकारे यांची वित्त व्यवस्था आणि त्यांचा परस्पर संबंध म्हणजे संघीय वित्तव्यवस्था असते. भारतात केंद्र सरकार आणि राज्यसरकार यांची कार्यक्षेत्रे निरनिराळी असल्यामुळे ही कार्ये करण्यासाठी प्रत्येक सरकारला वित्ताची सोय करणे आवश्यक असते. प्रत्येक घटकाचे आर्थिक क्षेत्र स्वतंत्र आहे. प्रत्येक राज्याला आपआपल्या आवश्यकतेनुसार उत्पन्न मिळविण्याचे, कर आकारण्याचे, कर्ज उभारण्याचे स्वातंत्र्य भारतीय राज्यघटनेने दिले आहे. त्याचप्रमाणे मिळविलेले उत्पन्न गरजेनुसार खर्च करण्याचे स्वातंत्र्य देखिल राज्य सरकारांना दिले आहे. मात्र या आर्थिक स्वातंत्र्याचा सत्तेच्या जबाबदारींशी संबंध जोडण्यात आला आहे.

केंद्र सरकारला झालेल्या वित्तीय लाभाचे सर्व राज्यांमध्ये समान प्रमाणात आणि न्यायोचित वाटप केले जाते. भारतात केंद्र सरकारचा प्रत्येक घटक राज्याशी समान व्यवहार आहे. आर्थिक दृष्टचा कमकुवत असणाऱ्या राज्यांना केंद्र सरकार अनेक सवलती देते. प्रत्येक राज्य सरकारांना आपआपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी उत्पन्नाचे विविध माध्यमे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नात कमी-अधिकपणा आणता येण्याइतपत ही साधने लवचिक आहेत.

भारतात अकराव्या वित्त आयोगाने विविध प्रदेशांमधील विषमता कमी करण्यासाठी सधन राज्यातून निर्धन राज्यात उत्पन्न वितरित करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे देशातील सर्व जनतेला न्यूनतम राहणीमानाची हमी प्राप्त झाली आहे. परंतु या शिफारशीला काही सधन घटकराज्ये विरोध करीत आहेत.

भारताचे वित्तीय प्रशासन अत्यंत अकुशल आणि खर्चिक आहे. त्यामुळे आत्यंतिक करारोपणाचा व्यापार आणि उद्योगांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. जनतेत कर चुकवेगिरीची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. वित्तीय प्रशासन खर्चिक असल्याने सरकारी खर्चात अवाढव्य वाढ झाली आहे. वित्तीय भार वाढून कार्यक्षमता कमी झाली आहे. त्यामुळे राजस्व कमी मिळते. भारतात केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक सरकार आपआपला वेगवेगळा खर्च करीत असल्याने त्यांचा खर्च जास्त होतो.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यात आर्थिक वाद होऊ नयेत यासाठी करांचे अधिकार निश्चित करण्यात आले आहेत. वित्तीय साधनांबाबत भारतीय राज्यघटनेत वित्तीय अधिकारांचे निर्देश स्पष्टपणे दिले आहेत.

**केंद्र सरकारची वित्तीय साधने -**

केंद्र सरकारला राष्ट्रीय हिताची विविध कार्ये करावी लागतात. त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात वित्ताची आवश्यकता असते. त्यापैकी कर आकारणी हे केंद्र सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. राज्य घटनेच्या ७ व्या अनुसुचित केंद्र सरकारने आकारावयाच्या करांचा उल्लेख करण्यात आला आहे. या करांपैकी महत्वाचे कर पुढीलप्रमाणे आहेत.

१) शेतीमधील उत्पन्न सोडून इतर उत्पन्नावर आकारण्यात येणारा आयकर किंवा प्राप्तीकर.

२) महामंडळावरील कर किंवा निगमकर.

३) आयात आणि निर्यात कर किंवा सीमा शुल्क.

४) उत्पादन कर किंवा अबकारी शुल्क.

५) मालमत्ता शुल्क.

Scanned by CamScanner

६) शेतजमीन वगळून इतर संपत्तीच्या भांडवली मूल्यावर आकारण्यात येणारा कर.
७) महसूल शुल्क.
८) वर्तमान पत्राच्या खरेदी-विक्रीवर आकारण्यात येणारे कर आणि वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींवरील कर.
९) अंश विपणीत होणाऱ्या व्यवहारांवर लावण्यात येणारे कर.

**राज्य सरकारची वित्तीय साधने –**

भारतीय राज्यघटनेनुसार राज्य सरकारांना पुढील करांची आकारणी करण्याचा अधिकार आहे.

१) शेतसारा.
२) शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरील कर.
३) मादक पदार्थांच्या उत्पन्नावरील कर.
४) वर्तमानपत्रे वगळून इतर वस्तुंच्या खरेदी-विक्रीवरील कर.
५) शेतजमीनीवरील मालमत्ता आणि वारसा कर.
६) विशिष्ट प्रदेशात आणल्या जाणाऱ्या वस्तुंवर आकारला जाणारा कर.
७) मनोरंजन कर.
८) विजेवरील कर.
९) रस्ते आणि अंतर्गत जलवाहतुकीव्दारे ने-आण केल्या जाणाऱ्या उतारु आणि वस्तुंवरील कर.
१०) चैनीच्या वस्तूंवरील कर आणि यात्रा कर.
११) खाण मालकीवरील कर.
१२) मादक पदार्थांवरील अबकारी शुल्क.

वरील करांव्यतीरिक्त राज्य सरकारला केंद्राच्या उत्पन्न साधनातून देखील हिस्सा मिळतो. तसेच विविध प्रकारची अनुदाने, विशिष्ट कार्यासाठी मिळणारे आर्थिक सहाय्य आणि कर्जे ही सर्व राज्य सरकारची वित्तीय साधने आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या कलम २८० नुसार भारताच्या राष्ट्रपतीला ''वित्त आयोगाची'' नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. केंद्र सरकारला प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा राज्य सरकारांना किती आणि कोणत्या प्रमाणात वितरीत करावा यासंबंधी वित्त आयोग राष्ट्रपतींकडे शिफारशी करते. केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात वित्तीय सामंजस्य प्रस्थापित करण्यासाठी काय उपाययोजना करावी? ती कोणत्या आधारावर करावी याबाबत केंद्र सरकारला सल्ला देण्यासाठी दर पाच वर्षांनी केंद्र सरकार वित्त आयोग स्थापन करते. नवीन वित्त आयोगाचे कार्य सुरु होईपर्यंत पूर्वीच्या वित्त आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी सुरु असते. भारतात इ.स. १९५१ पासून आतापर्यंत अकरा वित्त आयोग नियुक्त करण्यात आले आहेत.

Scanned by CamScanner

**प्रा. धनंजय सरोदे**
एस. के. पोरवाल कॉलेज,
कामठी, नागपूर.

# बदलत्या आर्थिक धोरणाला सामूहिक विकासाचा आधार हवा

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सोव्हियत युनियनच्या आधारावर अनेक समस्यांना एकाचवेळी तोंड द्यावयाचे असल्यामुळे भूतपूर्व प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी पाश्चिमात्य संस्कृतीवरही प्रेम करून पंचवार्षिक योजनांचे ज्ञानामृत दिले याचा भारतीय अर्धपोटी भुकेलेल्या जनतेला विसर पडलेला नाही. सहाजिकच केंद्रीय नियोजनाचा नमुना स्वीकारला गेला कारण त्याशिवाय उपासमार, निरक्षरता, दारिद्र्य यासारख्या आक्राळविक्राळ समस्या सोडविणे शक्य नाही याबाबत नेहरूंना कल्पना होती. म्हणूनच स्थूल व सूक्ष्म दोन्ही पातळीवरचे पायाभूत ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्याची इच्छा होती. आर्थिक नियोजनाच्या धोरणाने स्थूल पातळीवर झेप घेतली परंतु सूक्ष्म पातळीवरील नियोजन व त्यातील धोरणांचा अमल होऊ शकलाच नाही.

माहितीचे ज्ञानात रूपांतर होऊ शकते परंतु माहितीपर्यंत पोहचविण्याची कामगिरी करण्यासाठी सर्वांना समावून घेऊन त्यासाठी कृती अभिप्रेत असते तेव्हाच प्रत्यक्षता दृष्टीस येते. सामान्य जनता, शेतकरी उद्योगपती व तंज्ञाशी भेट सम्पर्क साधला तरच क्रान्ती सफल होऊ शकते म्हणूनच स्थानिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी नवीन आर्थिक धोरणाची संकल्पना विचारात घेतल्यास आर्थिक सुधारणा करणे देशाच्या अर्थव्यवस्था स्वरूपात बदल घडवून आणणे असे म्हणता येईल. दुसऱ्या अर्थाने कुणी खाजगीकरण जागतीकरण किंवा उदारीकरण या अर्थाने प्रचार करेल.

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रास नव्या आर्थिक धोरणाचे आगळेवेगळेच महत्व आहे. भारतातील सर्व धोरणाचा विचार केल्यास अर्थव्यवस्थेत प्रमुख चार गोष्टी पायाभूत दिसून येतात. त्यात प्रचंड भयावह बेकारी, नागरीकांचे दारिद्र्य आणि भांडवल टंचाई याशिवाय तंत्रज्ञानातील अपुरेपणा होय. शेती व्यवसाय अर्थव्यवस्थेचा पाया आहे. शेती आणि शेतकरी केंद्र समजून सर्व वियोजन धोरणात्मक पद्धतीने मजबूत करण्याची नितांत गरज होती. शेतीचे अर्थशास्त्र सुधारले तरच देशाचा आर्थिक गाडा ठीक चालेल ही संकल्पना नाकारता येणार नाही 'समाजाची प्रगती शेती सुधारल्याशिवाय होणार नाही' असा विकासाचा राजपथ महात्मा गांधींनी दाखविला होता परंतु आपण ढोबळ संकल्पनेत हरवून गेलो.

Scanned by CamScanner

स्वातंत्र्यानंतर लगेच नौकरशाहीला पाठपुरावा मिळाला. सरकारी व निम्नसरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांची संख्या वाढली सोबतच सत्तेची प्रबलता वाढली. आज कुठल्याही क्षेत्रात ही संख्या अधिकाराने व अरेरावीने कार्यरत झालेली दिसते. शेती, उद्योग, विज्ञान, आरोग्य, वाणिज्य-अर्थशास्त्र, भूगोल, खगोल, अभियांत्रिकी समजत नसताना सुद्धा अधिकारी धडाकून निर्णय घेतांना दिसून येतात. त्यात राजकीय नेत्यांचा दुजोरा मिळतो. धान्याचे उत्पादन ज्यादा झाले असतांना आयात केले जाते. पूर्वी प्रबुद्ध कर्तृत्ववान आय. सी. एस. अधिकारी होते. ब्रिटीशांची आय. सी. एस. अधिकाऱ्यांची निवड पद्धती अस्सल बुद्धिवान तरूण नियुक्त करणे अशीच होती. आज हा वारसा पुढे चालविण्यासाठी आय. सी. एस. अधिकाऱ्यांची जागा प्रशासकीय अधिकारी वर्गानी घेतली आहे. आय. ए. एस. अधिकाऱ्यांना रोजगार कसा मिळेल याबद्दल सरकारला काळजी वाटत आहे.

शासनाने जागतीकरणाच्या व बहुराष्ट्रीय कंपन्याच नव आव्हान निमार्ण केले आहे त्याचा सर्वात प्रतिकूल परिणाम देशातील पायाभूत शेती व्यवसाय व मूलभूत उद्योगधंद्यावर होणार आहे. देशातील लघुउद्योग चाळीस टक्के रोजगार पुरवितो आणि या उद्योगातून पस्तीस टक्के निर्यात होत असते. नवीन धोरणामुळे लघुउद्योगावर आणि शेती व्यवसायावर विपरीत परिणाम झाल्यास सहाजिकच अर्थव्यवस्थेतील बेकार, गरीब सर्वसाधारण जीवन जगणाऱ्या लोकांना फटका बसेल. शेतीशी निगडीत असलेल्या उद्योगांवर आघात झाल्यास अर्थव्यवस्था नाजुक होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून नवीन उद्योग काढल्यास लाखो कामगार बाहेर पडतील. एका साखर कारखान्यात अंदाजे दहा हजार श्रमिकांची गरज असते. परंतु ब्राझीलचे तंत्रज्ञान अमलात आणल्यास फक्त दोनशे पन्नास कामगारांना काम मिळेल. चीनमध्ये ग्रामीण विकास यशस्वी कसा झाला व कोटच्यावधी तरूणांना आपल्याच गावात रोजगार कसा मिळाला याबद्दल अभ्यास केल्यास असे दिसून येते की, गांवात शेती करून शेताबाहेर प्रचंड रोजगार निर्माण करण्यात यश मिळाले. आपल्याकडे शेती संशोधन संस्था, प्रयोगशाळा, तंज्ञमंडळी असुनसुद्धा हरितक्रान्तीनंतर शेती भरीव वाटत नाही कारण संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही. हे राष्ट्रीय पथदर्शक प्रकल्पाव्दारे सिद्ध झाले आहे.

देशात जवळपास साठ टक्के लागवड पावसाच्या पाण्यावर होते. जमीन सुधारणा पुर्ण न झाल्यामुळे लोकसंख्या एक अब्ज झाल्यावर सुधारण्याची प्रक्रिया अवघड झालेली आहे. आता गरीब माणसाला पडीक जमीन दिली तर त्यावर खूप खर्च करावा लागेल. वैज्ञानिक नौकरशाहीला सुद्धा शेतीचे प्रत्यक्ष अनुभव व शेतीचे अर्थशास्त्र माहित नाही. उत्पादन खर्च, उत्पादनाची जोखीम आणि प्राप्ती या तीन गोष्टी शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. पिक घेण्याचा निर्णय वरील तीन गोष्टींवर अवलंबून असतो. कर्ज काढणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पन्न किती होईल याचा अंदाज घेता यावा परंतु शेतकरी संघटनेचे नेते श्री शरद जोशी यांनी मुद्दा उचलल्यानंतरच

Scanned by CamScanner

सरकारने याकडे गंभीरपणे लक्ष दिलंय. शेतीमूल्य आयोग प्रमुख पिकांची आधारभूत किंमत जाहीर करीत असते. राज्य सरकारच्या मदतीने शेतकऱ्यांना मालाचा भाव मिळतो. मालाचा भाव पेरणीपूर्वी जाहीर झाला पाहिजे. हिन्दुस्थानच्या चारही बाजूंची परिस्थिती यासाठी लक्षात घ्यावी लागेल. एका रूपयाला वस्तू विकत घेतली तर उत्पादकास कमीत कमी साठ पैसे मिळायला हवे. त्यासाठी शेतमाल एकटयाने विकण्याऐवजी एकत्र येऊन शेतमाल विकावा म्हणूनच मागील सरकारने छोटया शेतकऱ्यांसाठी शेती व्यवसाय संस्था सुरु करण्यासाठी सूचना केली होती.

जागतीकरणाने जगातील विविध देशामध्ये व देशातंर्गत उत्पादन व्यवस्थेत विषमता वाढत आहे. जागतिक बँकेची आकडेवारी लक्षात घेतल्यास गेल्या काही वर्षात जागतिक आंतरदेशीय उत्पादन दहा हजार अब्ज डॉलरहून तीस हजार अब्ज डॉलर झाले. जगातील बारा तेरा देशाकडे उत्पन्नाचा मोठा वाटा गेल्याने गरीब देशाकडे थोडाच वाटा आला. जगातील बहुसंख्य गरीब दक्षिण आशियामध्ये राहतात. त्यासाठी आपल्याला आपल्या नव्या धोरणाकडे डोळसपणं पाहावं लागेल. कारण देशाची चांगली वाईट स्थिती शेती व उद्योगामधून व्यक्त होत असते. स्वातंत्र्यानंतरच्या फक्त दहा वर्षापर्यंत राष्ट्रीय विकास व दारिद्रय निर्मूलनावरील निष्ठा कायम होती दुर्दैवाने त्यानंतर मात्र सर्व काही सामाजिक राजकीय गटा-गटात विभागले गेले या दृष्टीने खाजगीकरणाकडे पाहिले पाहिजे. उदारीकरणामुळे वस्तू व धान्य आयात करून प्रश्न सोडविण्याचा उपाय समोर आला परंतु उदारीकरण कायमची उपाययोजना होऊ शकत नाही.

भारतातील शेतीमाल व उद्योग वस्तू निर्यातीत कमी झाल्यास शेतकरी मुख्यतः स्पर्धेत टिकाव धरणार नाही. अमेरीकेने पंच्चेचाळीस मिलीयन डॉलर शेतकऱ्यांना सबसिडी दिल्यामुळे अनेक शेतमालाची निर्यात मोठयाप्रमाणात होत आहे. असा माल भारतीय बाजारपेठेत उपलब्ध झाल्यास उत्पादनावर अप्रत्यक्ष मोठा आघात होत आहे. नव्या आर्थिक धोरणाचा सर्वात जबरदस्त तडाखा भारतीय शेतकऱ्यास बसणार आहे. कमीत कमी पाणी व जमीन आणि जास्तीत जास्त उत्पादन घेतल्याशिवाय कुठलाही पर्याय शेतकऱ्यांना नाही त्यासाठी आपल्या धोरणाकडे काळजीपूर्वक सूक्ष्मपणे पाहणे आवश्यक आहे. बाजारपेठ गरीब शेतकऱ्यांच्या व गरीब लघुउद्योगाच्या विरोधाकडे झुकत असेल तर अनाथांना आधारच उरणार नाही. नव्या शतकाच्या उत्तरार्धात दारिद्रयनिर्मूलन व बेकारांना भुकेपासून मुक्त करण्यासाठी श्रीमंत राष्ट्राच्या धोरणाचा मसुदा तयार करण्याचे काम आणि चर्चेचे मुद्दे ठरवितांना दिसतात. सारख्या भागिदारांमध्ये चर्चा करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेने पुढाकार घेऊन भारतासारख्या विकसनशील राष्ट्राच्या सार्वभौमत्वासाठी मदत केली पाहिजे अथवा आपण आपली निवड केली पाहिजे. दुर्दैवाने सरकारला राजकारणामुळे अजिबात गांभीर्य नाही. यंदाच्या अर्थसंकल्पात पाणी व्यवस्थापनासाठी काहीही तरतूद नाही आणिबाणीच्या वेळी भूगर्भातील पाणी साठयांना अभयारण्यासारखे

Scanned by CamScanner

जपावे लागते कारण पाणी सामाजिक संपत्ती आहे. जल कायदा तयार करावा म्हणजे अडचणीच्या प्रसंगी गरीब शेतकरी व उद्योगांची दैना होणार नाही. रोजगार रहित आर्थिक विकास गरिबांचे बेहाल करेल म्हणूनच गांधीजी म्हणत 'आयात कमी कमी करत जाऊ आणि जगू'. एका अनुमानानुसार देशात साठवलेला काळा पैसा एकूण उत्पादनाच्या चाळीस टक्के आहे. काळा पैसा बाहेर काढून मोठ्याप्रमाणावर विदेशी कर्ज घेण्याचे सत्र बंद झाले पाहिजे. अन्यथा घटनेप्रमाणे देशी-विदेशी कर्ज घेण्याच्या मर्यादेवर विधेयक संसदेच्या दोन्हीसभागृहात आणता येईल. देशातंर्गत कर्ज उभे करण्याचे नवे आर्थिक धोरण अर्थव्यवस्थेस वेगळे वळण देऊ शकेल. आर्थिक विक्रिकरणाची प्रक्रिया स्वीकारून शेती व उद्योग क्षेत्रातील योजनांना सवलती देण्याची व्यवस्थाच आधुनिक तंत्रज्ञानाला पाठबळ देईल.

निसर्ग आपत्तीमुळे तीव्र हानीच्या भागात मनुष्याचं पुनर्वसन अत्यावश्यक असते. कामासाठी धान्य योजना राबवितांना तलाव, विहिरीतील गाळ काढणं अशी काम हाती घेतली पाहिजेत. प्रोफेशनल लोकांना अशा क्षेत्रात राज्य व जिल्हा पातळीवर सहभागी करता येईल. राजकीय नेतृत्वाकडून कृती झाल्यास अधिक मदत मिळेल. ग्रामपंचायतींना सक्षम करून व्यवस्थापन करावं लागेल. अंधकारमय भविष्य प्रकाशमय करायचं तर नवीन आर्थिक धोरण सूक्ष्म पातळीवर नियोजित करून अमलात आणण्याची गरज आहे.

***

Scanned by CamScanner



***प्रा. सौ. आशा सतीश लांजेवार,***
(अर्थशास्त्र प्राध्यापिका पी. ड ब्ल्यू. एस. महाविद्यालय. नागपूर)
एम. ए. अर्थशास्त्र, गृहविज्ञान, राज्यशास्त्र, एम. एड ,
एम. फिल - शिक्षण शास्त्र, एम. फिल. बालविकास.

# शिक्षित बेरोजगारीवर मात संयोजकाच्या कौशल्याचा स्विकार

आजच्या वाढत्या लोक संख्येच्या काळात भारतासारख्या अती लोकसंख्येच्या व विकसनशिल राष्ट्रापुढे या अनेक समस्या आहेत. त्यापैकी बेकारीची समस्या विचारवंत, समाज, शासन व अर्थशास्त्रज्ञ यांच्यासमोर एक ज्वलंत प्रश्न म्हणून उभी आहे. बेकारीच्या प्रश्नांची अतीव्यापती केवळ भितीदायक ठरत आहे असे नाही तर बेकारी मुळे दरवर्षी विविध समस्या निर्माण होत आहे.

भारत स्वतंत्र्य झाल्यावर पंचवार्षिक योजनांव्दारे सरकारने बेरोजगारी निर्मुलनासाठी निरनिराळ्या उपाययोजना सुरु केल्या आहेत. मात्र प्रत्येक योजनेमधील गुंतवणुकीने दरवर्षी अधिकचे रोजगार निर्माण केले जात असते तरी सध्या भारतात बेकारांच्या संख्येत दरमहा एक लाख व्यक्तीची भर पड त आहे.

**शिक्षितांमधील बेरोजगारी :-**

भारतात बेरोजगारींची समस्या आणि तिही विशेषतः शिक्षितांमध्ये एक गंभीर समस्या आहे. ही बेरोजगारीची समस्या सोडविण्याकरिता भारतात अनेक प्रयत्न केल्या गेले आहेत. परंतु रोजगारी बाबत सरकारनी केलेल्या प्रयत्नांचे स्वरुप आर्थिक नसून राजनैतिक असल्याचे जाणवते. भारतातील सद्यःस्थिती पाहता संपुर्ण अर्थव्यवस्थेवर सरकारी अथवा अर्ध सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनांचा इतका भार पडत चालला आहे की, राज्य सरकारांना आपल्या कर्मचाऱ्यांना वेतन देणे अतिशय कठिण जात आहे. परिणामतः अर्थ व्यवस्था राजकीय ओव्हरड्राप्टींगनी पिडीत आहे. या वरून असे म्हणता येईल की, बेरोजगारीचा सामना करण्याकरिता फक्त दोनच उपाय आहे. (१) वाढत्या लोकसंख्येचे नियंत्रण आणि (२) शिक्षित युवक युवतींना स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याची प्रेरणा व व्यवसायाकरिता आर्थिक साहाय्य.

**शिक्षितांमधील संयोजकाचे कौशल्य :-**

कुठल्याही आर्थिक प्रयत्नांना सफल बनविण्याकरिता फक्त श्रम , भुमी , भांडवल इत्यादि असून भागत नाही, तर जी व्यक्ति व्यवसाय उभारते तिच्यामध्ये स्वतःच्या व्यवसायाची नौका कौशल्याने हाकून तिला यशस्वीरित्या पैलतिरावर घेऊन जाण्याकरिता संयोजकाचे कौशल्य असणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

भारतात अनेक राष्ट्रीयकृत बँका शिक्षित बेकारांना व्यवसाय करण्याकरिता कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्यता द्यायला तयार असल्या तरी भारतातील शिक्षित युवक-युवती स्वतःला कर्ज घेण्यायोग्य समजत नाही अथवा व्यवसाय करण्याचे कुठलेही आवाहन ते स्विकारीत नाही. ही वस्तुस्थिती आहे. जर शिक्षितांमध्ये संयोजकाचे कौशल्य असेल तर ते श्रम , भुमी , भांडवल इत्यादी घटकांना जमवून कुठलीही आर्थिक योजना राबवू शकतील व त्या व्दारे बेरोजगारी निर्मुलन होऊ शकेल.

**बेरोजगारीच्या दृष्टीकोनातून संयोजकाच्या गुणांचे महत्व :-**

